भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र.६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०१/२०१७

**१) जमीनीवर पडुन डोक्याला मार लागल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक २३/०१/२०१७ रोजी १५.०६ वा. दरम्यान यातील मृतक मदन किसन बडवाईक वय ५० वर्ष, रा. देव्हाडी हा दारु पिण्याच्या सवयीचा होता. तो दारुचे नशेत असतांनी जमीनीवर पडुन डोक्याला मार लागल्याने त्यास उपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचार करुन डॉक्टरनी त्यास रेफर केल्याने उपचारास सामान्य रुग्णालय येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोना. रार्घोते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो. स्टे. तुमसर हे करीत आहे.

**२) अंधराचा फायदा घेवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . : –**

दिनांक २४/०१/२०१७ चे ०१.१० वा. दरम्यान यातील आरोपी हा अंधाराचा फायदा घेवुन आपले अस्तीव लपवुन उडवा उडवीचे उत्तर देवुन हस्तक्षेप गुन्हा करण्याच्या इरादयाने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ऊईके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १२२(अ) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मारोती स्वीप्ट चालकांच्या निष्काळजीपणामुळे, दोन जखमी . : –**

दिनांक २१/०१/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील मारोती स्वीप्ट चारचाकी वाहन हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडचे डावे बाजुला मोटार सायकल क्र. एमएच ३५ एफ ७४४३ वर डब्बलसिट बसुन थांबुन असलेल्या फिर्यादी व महीन्द्र शालीकराम नाकाडे वय ३६ वर्ष यांचे दुचाकीस धडक देवुन फिर्यादीस व महेन्द्र यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी उमाशंकर मदनलाल मस्करे वय ४५ वर्ष, रा. मुरदाळा यांचे बयान व वैदयकीय अधीकारी बी. जे. हॉस्पीटल गोंदीया यांचे एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) विषारी किटक नाशक औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु . :–**

दिंनाक १४/०१/२०१७ रोजी २०.०० वा. दरम्यान यातील मृतक आशिष महादेव रामगुडे वय २७ वर्ष, रा. खापरी भुयार याने किटक नाशक विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधेपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बिसने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

**५) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु . :–**

दिंनाक २२/०१/२०१७ रोजी १५.४५ वा. दरम्यान यातील मृतक धनपाल विजय राऊत वय २२ वर्ष, रा. कोंढा याने विषारी प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. नंदेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो. स्टे. अडयाळ हे करीत आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.